दाखल तारीख – ०४.०७.२०२३
नोंदणी तारीख – ०४.०७.२०२३
निकाल तारीख – १४.०५.२०२६
कालावधी – ०२ व.१० म.१० दि.

**कुडाळ येथील दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर), कुडाळ यांचे न्यायालयात**
**ता. कुडाळ, जिल्हा- सिंधुदुर्ग.**
( पिठासीन अधिकारी – जी. ए. कुलकर्णी )

**फौजदारी किरकोळ अर्ज नं.६७/२०२३**
**निशाणी क्र.– १७**

**गौरी प्रविण चव्हाण** }
**पूर्वाश्रमीची गौरी राजेश चौगुले** }
वय–२२ वर्षे, धंदा–काही नाही } **...अर्जदार**
सध्या रा.केळबाईवाडी कुडाळ }
ता.कुडाळ जि.सिंधुदुर्ग }

**विरुध्द**

**प्रविण प्रकाश चव्हाण** }
वय–२९ वर्षे, धंदा–व्यवसाय } **...सामनेवाला**
रा.आगर ता.शिरोळ, जि.कोल्हापूर }

---

अर्जदारतर्फे वकिल – श्री.आर.डी.बिले
सामनेवालातर्फे वकिल – श्री.ए.एम.कोळी

---

**न्यायनिर्णय**

**(घोषणा तारीख– १४.०५.२०२६)**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार हिने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अन्वये दाखल केलेला आहे.

**<u>अर्जदाराचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –</u>**

२. अर्जदार व सामनेवाला हा नात्याने पती पत्नी असून त्यांचा विवाह हिंदु धर्मातील रितीरिवाजानुसार दि.०४.१२.२०२२ रोजी नृसिंहवाडी येथे अशोक गोपाळ जोशी यांच्या घरात झाला त्यांचा विवाह हा प्रेमविवाह आहे. अर्जदार ही केवळ आठवीत असताना सामाजिक माध्यमांतून (Social media) मधुन दोघांचेही प्रेम जुळले आणि नंतर गोडगोड बोलून सामनेवाला योन अर्जदार हिला विवाहास भाग पाडले आणि त्यातून हा विवाह झालेला आहे. अर्जदार हिचे शालेय शिक्षणातील प्रगती खूप चांगली होती व तिचा शिक्षणाकडेच ओढ होती. परंतु, सामनेवाला याचे शिक्षणाशी वावडे आहे. त्याचा आणि शिक्षणाचा काडीमात्र संबंध नाही. अर्जदार हिचेसोबत लग्न करणे व तिला कामधंद्वाला घरात आणणे हा एकमेक हेतु सामनेवाला याचा होता व आहे. त्यामुळे वेगवेगळी कारणे सांगून अर्जदार हिला सामनेवाला याने विवाहाचा गहा घातला.

३. अर्जदार पुढे असे कथन करते की, अर्जदार हिने शिक्षणे पूर्ण झाले की विवाह करूया असे सामनेवाला याला सांगितले. परंतु सामनेवाला याने वेगवेगळी कारणे सांगून आणि स्वतःच्या घरातील अडचणी सांगून अर्जदार हिला विवाहासाठी उद्युक्त केले. विवाह करणेस अर्जदार हिच्या घरातून विरोध होता. परंतु अर्जदार हिच्या प्रेमाखातर अर्जदार हिच्या माहेरच्या लोकांनी विवाहाला संमत्ती दिली. अर्जदार हिच्या आईने हा विवाह रजिस्टर पध्दतीने करूया असे सामनेवाला याला आणि त्यांच्या घरच्या माणसांना सांगितले होते. त्यानुसार नोटरी जवळ जावून कागदपत्रे पूर्ण केलीत आणि नृरसिंहवाडी येथे भटजीचे घरी हा विवाह कार्यक्रम संपन्न झाला.

४. अर्जदार पुढे असे कथन करते की, विवाहाचे पूवी्र अर्जदार हिला chartered accountant चे शिक्षण पूर्ण करावयाचे आहे असे अर्जदार हिने सांगितले होते. परंतु, सामनेवाला

याने अर्जदार हिच्या शिक्षणाची जबाबदारी ही त्याची आहे. तुम्ही काळजी करू नका तिचे शिक्षण पूर्ण करतो असे आश्वासन अर्जदार हिला व तिच्या माहेरच्या माणसांना सामनेवाला याने दिले. त्यावेळी तिच्या शिक्षणाचा खर्च सामनेवाला याने केला पाहिजे असे अर्जदार हिचे आईने सांगितले त्यावेळी सामनेवालाच्या घरातील माणसांनी मान्य केले.

**५.** अर्जदार पुढे असे कथन करते की, विवाहानंतर सगळा प्रकार बदलून गेला मुळातच सामनेवाला याला शिक्षण या विषयात काहीही गम्य नव्हते. त्यामुळे विवाहाच्या पहिल्याच दिवशी तुला शिक्षण बिक्षण काहीही मिळणार नाही तू भांडी घास आणि त्यासाठीच तुला आण्लो आहे असे सामनेवाला याने अर्जदार हिला सांगितले. तसेच सामनेवाला ह्याच्या आईने सुध्दा तुला घरातील कामे करायची नसतील तर तु चालती हो तुझ्या शिक्षणासाठी पैसे खर्च करायला आमच्याकडे पैसे नाहीत असे सामनेवाला ह्याच्या आईने अर्जदार हिला बजाविले. त्यानंतर दि.१२.१२.२०२२ रोजी म्हणजे विवाहाच्या केवळ ८ दिवसांनी सामनेवाला याने अर्जदारसोबत विनाकारण भांडण काढले आणि त्याने तुझ्या शिक्षणासाठी पैसे नाहीत तू घरातून चालती हो असे अर्जदार हिला सांगितले आणि अर्जदार हिला घरातून बाहेर काढले त्यामुळे अर्जदार हिला केवळ नाईलाजाने माहेरी आईकडे गाव कुडाळ येथे जावे लागले.

**६.** अर्जदार पुढे असे कथन करते की, सामनेवाला याने अर्जदार हिची काहीही चौकशी केली नाही. मात्र दि.१८.०४.२०२३ रोजी सामनेवाला याने अर्जदार हिला खोडसाळ नोटीस पाठवली. अर्जदार हिने वकिलांमार्फत सदर नोटीसीला उत्तर दिलेले आहे. अर्जदार हिला सध्या तिच्या आईवर ओझे बनुन रहावे लागत आहे. अर्जदार व अर्जदार हिच्या आईला उपजिवीकेचे कोणतेही साधन नाही. अर्जदाराची आई ही मोलमजुरी व घरकाम करते. अर्जदार हिला स्वत:चा असा

कोणताही व्यवसाय नाही. त्यामुळे स्वत:ची उपजिवीका करणे अर्जदार हिला अशक्य बनले आहे. सामनेवाला हा धडधाकट पुरूष आहे तो अर्जदार हिचे संगोपण करण्यास समर्थ आहे. सामनेवाला याचे स्वत:चे मालकीचे केसकर्तनालय असून महिन्याला त्याला २०,००० ते २५,०००/– मिळतात. सामनेवाला याने अर्जदार हिला पुर्णपणे दुर्लक्षित केले आहे. अर्जदार आणि सामनेवाला वेगवेगळे राहत असलेल्या काळात सुध्दा त्याने अर्जदार हिच्या पोटगीची व्यवस्था केली नाही. सबब अर्जदार हिला सामनेवाला याचेकडून पोटगी मिळणेकरिता अर्ज दाखल करावा लागत आहे.

७. प्रस्तुत अर्जास सामनेवाला याने निशाणी १० वर म्हणणे मांडून अर्जदार हिचा सदरचा अर्ज व त्यातील संपूर्ण मजकूर सामनेवाला यास मान्य व कबूल नसल्याने प्रस्तूतचा अर्ज सामनेवाला याने नाकारला आहे. सामनेवाला पुढे असे कथन करतात की, सदर विवाहामध्ये सामनेवालाने अर्जदारास एक तोळा सोन्याचे गंठण व अर्धा तोळा सोन्याची कर्णफुले, चांदीचे पैजण व जोडव्या असे दागिने घातले आहेत आणि सदर विवाहाचा संपूर्ण खर्च हा सामनेवालानेच केलेला आहे. विवाहानंतर अर्जदार ही सामनेवालाच्या घरी नांदणेस आल्या. सामनेवाला याचे अर्जदारवर व अर्जदारचे सामनेवालावर लग्नापूर्वी एक वर्षापासून प्रेम असलेने आणि सामनेवालाचे आईचा सदर प्रेम विवाहास विरोध होता, तरीही अर्जदारचा सामनेवालासोबत विवाह झाला असलेने विवाहानंतर अर्जदार या अतिशय खुश, प्रसन्न व आनंदी होत्या सुरूवातीचे आठ दिवस अतिशय आनंदी, उत्साही राहून अर्जदार व सामनेवालाने एकमेकांस भरभरून प्रेम दिले.

८. सामनेवाला यांचे कथनाप्रमाणे विवाहानंतर आठ दिवसांनी अर्जदार या तिचे आईचे इच्छेखातर माहेरी गेल्या. अर्जदार माहेरी गेल्यानंतर अर्जदार यांची आई सामनेवालास वारंवार फोन करून ''आता मी मुलगीला परत पाठविणार नाही'' असे सांगत असत. परंतु सामनेवालाने

अर्जदारला फोन करून ''गावची याजा जवळ आली आहे, यात्रेदिवशी तु घरी असणे आवश्यक आहे, त्यामुळे कोणाचेही न ऐकता तु घरी नांदणेस ये'' असे वारंवार कळविलेनंतर अर्जदार या यात्रेदिवशी सामनेवाला यांचेकडे नांदणेस आल्या. अर्जदार हिला तिच्या आईचा वांरवार फोन येत असे व आईचा फोन आल्यानंतर अर्जदार ही माहेरी जाणेचा हट्ट करीत असे. सामनेवालाने अर्जदारास माहेरी न जाणेबाबत विनवणी केली असता, अर्जदार या क्षुल्लक कारणावरून सामनेवाला सोबत भांडण काढीत असे. अर्जदार ही आईचे शिकवणूकीवरून '' मी स्वयंपाक करणार नाही, धुणीभांडी करणार नाही'' असे म्हणून सामनेवालाशी भांडण काढून सामनेवालास त्रास दिला आहे. सामनेवालाने अर्जदार वरील प्रेमापोटी अर्जदारचे सर्व हट्ट व लाड पुरविले आहेत.

९. सामनेवाला यांच्या कथनाप्रमाणे सामनेवालाने अर्जदारचे पुढील शिक्षण घेणेकरिता सांगली येथील एका कॉलेजमध्ये/इन्स्टिटयुट मध्ये प्रवेश घेणेची सर्व तयारी केती होती, परंतु अर्जदारने तिचे आईचे शिकवणूकीवरून ''मी माझे माहेरीच शिक्षण पूर्ण करणार'' असे म्हणून सामनेवाला सोबत भांडण करून माहेरी जाणेचा हट्ट धरला व सामनेवाला सोबत मोठमोठयाने भांडण करणेस सुरूवात केली. दि.२५.०२.२०२३ रोजी अर्जदारने ''मला माझ्या माहेरी जायचे आहे'' असे म्हणून हट्ट धरला, त्यावेळी सामनेवालाने अर्जदार हिला समजावून सांगण्याचे प्रयत्न केले असता, अर्जदारने आरडाओरड करून सामनेवालाशी भांडण काढले व सामनेवाला हे ग्राहाकचे केस कापण्यासाठी बाहेर गेल्याचे तसेच सामनेवालाचे आई-वडील व भाऊ शेताकडे गेलेचे पाहून घरी कोणीही नसल्याचा गैरफायदा घेवून अर्जदार या सोन्याचे व चांदीचे दागिने, कपडेलत्त घेवून परस्पर माहेरी निघुन गेलेल्या आहेत. सामनेवाला व त्याचे घरातील इसमांनी अर्जदार या घरी नसल्यामुळे अर्जदार हिला फोनवर संपर्क केला असता, अर्जदार यांनी '' मी माझे माहेरी जात आहे'' असे सांगून

सामनेवालाचा फोन बंद केला.

१०. सामनेवाला पुढे असे कथन करतात की, सामनेवालाने अर्जदार हिस फोन केला असता, अर्जदारची आई अर्जदारास सामनेवालासोबत बोलू देत नाही, अर्जदारची आईच फोन उचलून ''माझी मुलगी तुझयाकडे नांदणेस येणार नाही, आम्ही पोलीस स्टेशनमध्ये तुझयावर तक्रार करणार आहे, तु माझया मुलीला विसरून जा' असे वारंवार सांगत आहे, तसेच अर्जदारची आई फोनवरती सामनेवालास अतिशय घाणेरडया शिव्या देत आहे. दि.१८.०४.२०२३ रोजी सामनेवालाने ॲड.सुनिल शामराव म्हाळुंगेकर यांचेमार्फत अर्जदारास नोटीस पाठवून नांदणेस येणेबाबत कळविले आहे. परंतु अर्जदारने नांदणेस न येता ॲड. राजीव बिले यांचेमार्फत नोटीस पाठवून नांदणेस येणेचे टाळले.

११. सामनेवाला पुढे असे कथन करतात की, सामनेवालाचे अर्जदारवरती लग्नाचे पूर्वीपासून जीवापाड प्रेम होते व आजही आहे. सामनेवालास अर्जदारसोबत संसार करण्याची मनापासून इच्छा होती व आहे. सामनेवाला हे आर्थिक कुवतीप्रमाणे अर्जदारास सांभाळणेस व अर्जदारची हौस, पुरविणेस आणि अर्जदारचे पुढील शिक्षण पूर्ण करणेस तयार होते व आहेत. अर्जदारची आई देखील अर्जदारचे वडीलांपासून विभक्त राहत आहे व अर्जदारांना सामनेवालापासून विभक्त ठेवत आहेत. सामनेवालाने मे.दिवाणी न्यायाधीश साो वरिष्ठ स्तर, जयसिंगपूर यांचे कोर्टात अर्जदाराने नांदणेस यावे म्हणून अर्जही दाखल केला आहे. अर्जदार हिने प्रस्तुतचा खोटा व खोडसाळ अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती सामनेवाला यांनी केली आहे.

१२. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

१३. अभिलेखावरील दाखल कागपत्रांचे अवलोकन केले असता, पुढील मुद्दे माझ्या विचाराधीन आलेले असून त्याचे कारणमिमांसासह उत्तर पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार या स्वत:चे भरण पोषण करण्यास असमर्थ आहे असे अर्जदार सिध्द करतात काय ? | **होय** |
| २. | सामनेवाला यांना उत्पन्नाचे पर्याप्त व सबळ साधन आहे असे अर्जदार सिध्द करतात काय ? | **होय** |
| ३. | सामनेवाला यांनी अर्जदार यांच्या भरण पोषणास नकार दिला किंवा दुर्लक्ष केले असे अर्जदार सिध्द करतात काय ? | **होय** |
| ४. | अर्जदार या सामनेवाला यांचेकडून दरमहा रक्कम रुपये १०,०००/– इतकी पोटगी मिळणेस पात्र असल्याचे अर्जदार सिध्द करतात काय ? | **अंशत: होकारार्थी** |
| ५. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

१४. अर्जदारने तिच्या मागणीच्या अनुषंगाने साक्षीदार क्र. १ म्हणून स्वत:चे पुराव्याचे शपथपत्र निशाणी १४ वर दाखल केलेले आहे. तथापि, तिने कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. तसेच निशाणी १५ वर पुरशिस देवून अर्जदारने तिचा पुरावा बंद केला आहे. अर्जदारतर्फे विद्वान विधिज्ञ यांनी त्यांचा लेखी युक्तीवाद निशाणी क्र.१६ वर दाखल केलेला आहे.

१५. याउलट, सामनेवाला याने त्याच्या म्हणण्याच्या अनुषंगाने पुरेशी संधी देवून देखील कोणताही मौखिक वा कागदोपत्री पुरावा सादर केला नाही. त्यामुळे सामनेवाला यांचेविरूध्द निशाणी

०१ वरील दि.१८.०४.२०२६ रोजीचे आदेशाने त्यांचा पुरावा बंद करणेत आलेला आहे.

–::– **कारणमिमांसा** –::–

**मुद्दे क्र.१ ते ३ करीताः–**

**१६.** प्रस्तुतचा अर्ज अर्जदार हिने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अन्वये दाखल केलेला असलेमुळे त्याअंतर्गत नमुद असणारी दाद मिळणेकरिता अर्जदार हिने ती स्वत:चे भरण पोषण करणेस असमर्थ असल्याचे, सामनेवाला यांचेकडे उत्पन्नाचे पर्याप्त साधन असल्याचे, सामनेवाला यांनी अर्जदार यांचे भरण पोषाणास नकार दिल्याचे व सामनेवाला यांनी तिचा कोणत्याही संयुक्तिक कारणाविना त्याग केल्याचे सिध्द करणे अत्यंत जरुरीचे आहे.

**१७.** अर्जदार यांनी त्यांचे कथनाचे पुष्टयर्थ निशाणी १४ वर साक्षीदार क्र. १ म्हणून स्वतःची साक्ष नोंदविलेली आहे. त्यांनी त्यांचे साक्षीदरम्यान त्यांच्या अर्जातील कथनांचा पुनरूच्चार केल्याचे दिसून येत आहे. त्यांच्या साक्षीचे अवलोकन केले असता, त्यांचे कथनानुसार अर्जदार व सामनेवाला यांचा दि.०४.१२.२०२२ रोजी हिंदु विवाह पध्दतीनुसार झाला. विवाहानंतर अर्जदार ही सामनेवाला यांचे घरी नांदावयास गेली. विवाहापूर्वी अर्जदार हिला सामनेवाला याने तिच्या शिक्षणाची जबाबदारी सामनेवालाची आहे तुम्ही काळजी करून नका तिचे शिक्षण सामनेवाला पूर्ण करतो असे आश्वासन अर्जदार हिला व तिच्या माहेरच्या माणसांना दिले होते. सामनेवाला याला शिक्षण विषयात गम्य नव्हते. सामनेवाला याने अर्जदारला विवाहाच्या पहिल्या दिवशी तुला शिक्षण बिक्षण काहीही मिळणार नाही तु भांडी घास आणि त्यासाठीच तुला आणले आहे असे सामनेवाला याने अर्जदारला सांगितले. सामनेवाला याच्या आईने सुध्दा तुला घरातील कामे करायची नसतील तर तु चालती हो तुझ्या शिक्षणासाठी पैसे खर्च करायला आमच्याकडे पैसे नाहीत असे सामनेवाला याच्या आईने

अर्जदार हिला बजाविले. दि.१२.१२.२०२२ रोजी म्हणजे विवाहाच्या केवळ ८ दिवसांनी सामनेवाला याने अर्जदार सोबत विनाकारण भांडण काढले आणि त्याने तुझ्या शिक्षणासाठी पैसे नाहीत तु घरातुन चालती हो असे अर्जदार हिला सांगितले आणि अर्जदार हिला घरातून बाहेर काढले त्यामुळे अर्जदारला नाईलाजास्तव माहेरी आईकडे गाव कुडाळ येथे जावे लागले. त्यानंतर सामनेवाला याने अर्जदार हिची काहीही चौकशी केली नाही. दि.१८.०४.२०२३ रोजी सामनेवाला याने अर्जदार हिला खोडसाळ नोटीस पाठविली. अर्जदार हिने वकिलांमार्फत सदर नोटीसीला उत्तर दिलेले आहे. अर्जदार हिला सध्या तिच्या आईवर ओझे बनून रहावे लागत आहे. अर्जदार व अर्जदार हिच्या आईला उपजिविकेचे कोणतेही साधन नाही. अर्जदार हिला स्वत:चा असा कोणताही व्यवसाय नाही. त्यामुळे स्वत:ची उपजिवीका करणे अर्जदार हिला अशक्य बनले आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे.

**१८.** सामनेवाला यांच्या कथनाप्रमाणे अर्जदार हया स्वत:हून तिचे माहेरी राहत असून त्यांनी स्वत: कोणत्याही संयुक्तिक कारणाविना सामनेवाला यांचा त्याग केलेला आहे. जर अर्जदार यांना सामनेवाला यांचेसोबत संसार करणेची इच्छा असती तर अर्जदार यांनी सामनेवाला यांना नांदणेस नेणेबाबत नोटीस पाठविली असती अथवा न्यायालयामध्ये दाद मागितली असती. परंतु, अर्जदार यांनी तशी कोणतीही नोटीस सामनेवाला यांना पाठविली नाही. त्यामुळे अर्जदार यांना सामनेवाला यांचेसोबत संसार करावयाचा नसल्याने अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेची विनंती केलेली आहे. याउलट, सामनेवाला यांनी अर्जदार यांना दि.१८.०४.२०२३ रोजी सामनेवाला यांनी अर्जदारास नोटीस पाठवून नांदणेस येणेबाबत इच्छा व्यक्ती केली. त्यास अर्जदार हिने नकार दिल्याचे दिसून येते. सामनेवाला यांना अर्जदार यांचेसोबत कोणतेही नातेसंबंध ठेवणेची

इच्छा नसल्याचे स्पष्ट होते. तसेच सामनेवाला यांनी अर्जदार यांचा त्याग केलेनंतर अर्जदार हिची कोणत्याही उदरनिर्वाहाची तरतुद सामनेवाला यांनी केली नसल्याने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याची विनंती अर्जदारतर्फे विद्वान विधिज्ञ यांनी केली.

**१९.** अभिलेखावरील दाखल साक्षी पुराव्यांचे व म्हणण्याचे अवलोकन केले. दि.१२.१२.२०२२ रोजी म्हणजे विवाहाच्या केवळ ८ दिवसांनी सामनेवाला याने अर्जदार सोबत विनाकारण भांडण काढले आणि त्याने तुझ्या शिक्षणासाठी पैसे नाहीत, तु घरातून चालती हो असे अर्जदार हिला सांगितले आणि अर्जदार हिला घरातून बाहेर काढले तेव्हा अर्जदार ही माहेरी म्हणजे तिच्या आईकडे गाव कुडाळ येथे राहत असल्याचे कथन केलेले आहे. सामनेवाला यांचे कथनाप्रमाणे अर्जदार ही तिचे आईचे इच्छेखातर माहेरी गेल्या. माहेरी गेल्यानंतर अर्जदार हिच्या आईने सामनेवालास वारंवार फोन करून आता मी मुलगीला परत पाठविणार नाही असे सांगत असे. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांचे अर्जात केलेली कथने चुकीची आहेत. अभिलेखावरील दाखल अर्जदार व सामनेवाला यांचे साक्षी पुरावे व म्हणण्याचे अवलोकन केले असता, अर्जदार हया सामनेवाला यांचेपासून विभक्त राहत असलेची बाब स्पष्ट दिसून येत आहे.

**२०.** फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ प्रमाणे दाखल अर्जाचे कामी अर्जदार या त्यांचे स्वत:चे भरण पोषण करण्यास असमर्थ आहेत का हे पाहणे गरजेचे आहे. अर्जदार व सामनेवाला यांचे कथनाप्रमाणे सामनेवाला यांनी अर्जदार यांची कोणतीही उदर भरणाची अथवा औषधपाण्याची अथवा पालनपोषणाची कोणतीही तरतुदी केली नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अर्जदार हया त्यांचे भरण पोषण करणेस समर्थ आहेत.

**२१.** **अ– भारतीय पुरावा कायदा कलम १०३** –विशिष्ट तथ्यासंबंधीचा शाबितीचा भार

कोणत्याही एखादया विशिष्ट व्यक्तीवर राहील असा कोणत्याही कायदयाने उपबंध केलेला नसेल तर, जी व्यक्ती न्यायालयाला त्या तथ्याच्या अस्तित्वावर विश्वास ठेवण्याचे आवाहन करील तिच्यावर त्या तथ्याच्या शाबितीचा भार राहील.

**ब– भारतीय पुरावा कायदा कलम १०४** – पुरावा स्वीकार्य होण्यासाठी शाबित करावयाचे तथ्य शाबित करण्याचा भार – जे कोणतेही तथ्य कोणत्याही व्यक्तीला अन्य एखादया तथ्याबद्दल पुरावे देणे शक्य व्हावे म्हणुन शाबित करण्याची जरुरी असते ते शाबित करण्याचा भार असा पुरावा देवु इच्छीणाऱ्या व्यक्तीवर असतो.

२२. भारतीय पुरावा कायदयातील वर नमूद तरतुदींचा विचार करता, एखाद्या व्यक्तीस एखादी घटना माहिती असेल, अथवा माहिती असलेली बाब शाबीत करणेकरिता अन्य पुराव्याची गरज असेल त्यावेळी तशी माहिती असलेली व्यक्ती न्यायालयासमोर आणून त्यांचेकडून एखादी घटना शाबीत करून घेणे गरजेचे असल्याचे दिसून येत आहे. कौंटुबिक वाद हे पती व पत्नी यांचे वैयक्तिक माहिती मधील असणारी बाब आहे. त्यामुळे पती अथवा पत्नी यांनी त्यांना माहिती असलेली बाब पुराव्याआधारे सिध्द करणेची जबाबदारी ज्याचे त्याचे वर असल्याचे वरनमूद तरतुदींवरून दिसून येत आहे. त्यामुळे सामनेवाला यांनी अर्जदार यांनी दाखल केलेल्या प्रस्तुत अर्जाचे कामी त्यांचे म्हणणे सिध्द करणेकरिता सबळ पुरावा सादर करणे अपेक्षित असून त्यांचे माहितीमधील बाब त्यांनी सिध्द करणे गरजेचे आहे. परंतु, सामनेवाला यांनी तसा कोणताही पुरावा अभिलेखावर आणला नसल्याचे दिसून येत आहे.

२३. सामनेवाला यांनी त्यांचे लेखी म्हणणे (नि.क्र.१०) दाखल केले. परंतु, त्यांनी अर्जदार (सा.क्र.१) यांचा उलटतपास घेवून त्यांचे साक्षीपुराव्यातील कोणतेही कथन आव्हानीत केले

नाही अगर खोडुन काढलेले नाही. त्यामुळे अर्जदार यांचा साक्षीपुरावा अबाधीत राहिला तसेच सामनेवाला यांनी आपला साक्षी पुरावा दिलेला नाही. तसेच सामनेवाला याने अर्जदारास नांदविण्याबाबत काय प्रयत्न केले किंवा कसे याबाबत काहीही नमुद केलेले नाही. सामनेवाला याने अर्जदारासोबत असलेले नातेसंबंध नाकारलेले नाहीत. त्याचप्रमाणे अर्जदार या माहेरी राहत असल्याची बाब देखील नाकारलेली नाही. त्यामुळे पत्नीची काळजी घेणे ही सामनेवालाची जबाबदारी आहे. यावरून सामनेवाला यांनी अर्जदार यांचा कोणत्याही संयुक्तिक कारणाविना त्याग केला असल्याचे व अर्जदार या स्वत:चे भरण पोषण करण्यास असमर्थ असल्याची बाब अर्जदार यांनी सिध्द केली असल्याचे दिसून येत आहे. सामनेवाला हे त्यांचे दैनंदिन कामकाज करण्यास व अर्जदार यांचे पालनपोषण करण्यास समर्थ असल्याचे दिसून येत आहे. या सर्व विवेचनांचा एकत्रित विचार करता अर्जदार या त्यांचे भरण पोषण करण्यास असमर्थ असल्याचे व सामनेवाला यांचेकडे पर्याप्त व सबळ साधन असल्याची बाब सिध्द करत असून सामनेवाला यांनी अर्जदार यांची भरणपोषणाची कोणतीही तरतुदी केली नसल्याचे देखील अर्जदार यांनी सिध्द केले असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मी मुद्दे क्र.१ ते ३ चे उत्तर '***होकारार्थी***'नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.४ करीता:</u>–**

**२४.** कोणतीही स्त्री तिला सासरी चांगली वागणुक मिळत असेल तर ती स्वेच्छेने आपला संसार मोडुन माहेरी राहणे पसंत करणार नाही, ती आपला संसार सुखाचा होणेकरिता सासरी होणारा छळ सहन करते. अगदी अशक्य झाल्यानंतरच ती सासरच्या लोकांविरुध्द दाद मागण्याकरिता पोलीस स्टेशन व न्यायालयात जाऊन तिचा छळ होऊ नये व तिला व्यवस्थित नांदविण्यात यावे याचा प्रामाणिक प्रयत्न करत असते, तोच प्रयत्न प्रस्तुत प्रकरणात अर्जदार हिने केल्याचे दिसुन येते.

**२५.** सामनेवाला हे अर्जदार यांच्या पालनपोषणाची कोणतीही जबाबदारी पार पाडत नसल्याचे दिसून येते. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अंतर्गत आर्थिक दिलासा आदेशाची व्याप्ती खुप मोठी असुन त्यामध्ये व्यथित व्यक्तीस झालेले नुकसान, वैद्यकीय खर्च, पोटगी या बाबीचा समावेश होतो. सदरचे आदेश देताना केलेली आर्थिक मदत ही योग्य, वाजवी, उचित आणि व्यथित व्यक्तीच्या राहणीमानाशी सुसंगत असणे गरजेचे आहे. अर्जात नमुद परिस्थितीप्रमाणे पोटगी म्हणुन योग्य अशी रक्कम अर्जदाराला देता येते.

**२६.** प्रस्तुतकामी अर्जदार हिने सामनेवालाचे स्वत:चे मालकीचे केसकर्तनालय असून त्यातून सामनेवाला याला महिन्याला २०,००० ते २५,०००/– इतके उत्पन्न मिळते असे कथन केलेले आहे. याउलट, सामनेवाला यांनी अर्जदार हिचे सदरचे कथन नाकारले नसल्याचे दिसून येत आहे. अर्जदार व सामनेवाला यांनी मा.ना. सर्वोच्च न्यायालय यांचे ***<u>रजनिश विरुध्द नेहा</u>*** निर्देशाप्रमाणे त्यांचे उत्पन्न व खर्चाचे प्रतिज्ञापत्र देखील अभिलेखावर सादर केलेले नाही.

**२७.** अर्जदार हिने अर्जामध्ये तिचेकरिता दरमहा पोटगी मिळणेबाबत विनंती केलेली आहे. अर्जदार ही स्वतःचा सांभाळ करणेस असमर्थ असल्याचे व तिची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असून, ती स्वत:चा उदरनिर्वाह करू शकत नसल्याचे दिसून येत आहे. तसेच तिचेकडे उत्पन्नाचे असे कोणतेही साधन नाही. त्याकारणाने अर्जदार हिला फार आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. अर्जदार हिला प्रचंड मानसिक व आर्थिक त्रास होत आहे असे असल्याचे कथन केलेले आहे. याउलट, सामनेवाल्याची आर्थिक परिस्थिती चांगली असल्याचे दिसून येत आहे. अर्जदार ही निश्चितपणे सामनेवाला ज्या प्रमाणे राहत आहे. त्या दर्जाचे राहणीमान मिळणेस पात्र आहे. अशा परिस्थितीमध्ये दिवसेंदिवस वाढत असलेली महागाई, अर्जदारच्या दैनंदिन गरजा विचारात घेता,

अर्जदार ही सामनेवाला याचेकडून दरमहा स्वतःकरिता रक्कम रुपये ३,५००/- इतकी पोटगी प्रस्तुतचा अर्ज दाखल तारीखेपासून मिळण्यास पात्र असल्याचे दिसून येते. त्यामुळे मी मुद्दा क्र.४ चे उत्तर '***अंशत: होकारार्थी*** नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ५ करिता</u>:-**

२८. वर नमूद कारणमिमांसेचा एकत्रित विचार करता सामनेवाला यांनी अर्जदार यांचे पालनपोषणाची कोणतीही तरतुद केली नसल्याने अर्जदार यांना प्रस्तुतचा अर्ज न्यायालयात दाखल करावा लागला असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्जाचा खर्च म्हणून पती या नात्याने सामनेवाला याने अर्जदार हीस रक्कम रुपये ५,०००/- देणे न्यायोचित ठरते. करिता मुद्दा क्र.५ चे उत्तरादाखल पुढील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

**१.** अर्ज अंशतः खर्चासह मंजुर करणेत येत आहे.

**२.** अर्जदार यांना सामनेवाला यांनी दरमहा पोटगी रक्कम रुपये ३,५००/- (अक्षरी तीन हजार पाचशे रुपये मात्र) अर्ज दाखल तारखेपासुन प्रत्येक महिन्याच्या दहा तारखेच्या आत देण्यात यावी असा आदेश करण्यात येत आहे.

**३.** प्रस्तुत अर्जाचे खर्चापोटी सामनेवाला यांनी अर्जदार यांना रक्कम रुपये ५,०००/-(अक्षरी पाच हजार रुपये फक्त) देण्याचे आदेशित करण्यात येत आहे.

**४.** या न्यायनिर्णयाची प्रत फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२८ अन्वये अर्जदार यांना मोफत देणेत यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

सही/-

[ जी.ए. कुलकर्णी ]

दिनांक-१४.०५.२०२६. न्यायदंडाधिकारी वर्ग-१, कुडाळ.